# शिवाजी विद्यापीठामार्फत आविष्कार संशोधन महोत्सव २०१९—२० चे आयोजन

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या आविष्कार संशोधन महोत्सव २०१९—२० चे वेळापत्रक नुकतेच निश्चित करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठाशी संलग्नीत असणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक आपले संशोधन सादर करू शकतात. महोत्सवामध्ये सहभागाचे पुढीलप्रमाणे चार स्तर आहेतः पदवी (UG), पदव्युत्तर (PG), एम.फिल./पीएच. डी. साठी प्रवेशीत असणारे विद्यार्थी (PPG) आणि एम.फिल./पीएच. डी. साठी प्रवेशीत असणारे परंतु एम.फिल./पीएच. डी. पदवी प्राप्त न केलेले महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षक (TH).

पदवी स्तरासाठी प्रथम फेरी दि. ०६/०१/२०२० रोजी जिल्हास्तरावर घेण्यात येणार आहे. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील विद्यार्थांसाठी ही फेरी अनुक्रमे राजाराम महाविद्यालय कोल्हापूर, बळवंत कॉलेज विटा व बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण या यजमान महाविद्यालयामध्य आयोजित करण्यात आली आहे. इतर तीन स्तरांसाठी महोत्सवाचे आयोजन दिनांक ०८/०१/२०२० रोजी तंत्रज्ञान अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या ठिकाणी करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थांनी आपले प्रवेश अर्ज आपल्या कॉलेजच्या प्राचार्या मार्फत संबंधीत यजमान महाविद्यालयाकडे/अधिविभागाकडे मोहोत्सवाच्या दिनांकाच्या आठ दिवस आगोदर पाठवायचे आहेत. सदर प्रवेश अर्ज विद्यापीठाच्या संकेत स्थळावर (www.unishivaji.ac.in/bcud/Avishkar) तसेच सर्व महाविद्यालयामध्ये उपलब्ध करण्यात आले आहेत.

प्राथमिक फेरीतून निवडलेल्या पदवी स्तरातील विद्यार्थांसाठी द्वितीय फेरीचे आयोजन दि. ०८/०१/२०२० रोजी तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे करण्यात आले आहे. द्वितीय फेरीतून निवडले जाणारे विद्यार्थी मुंबई विद्यापीठ येथे दि. २८ ते ३०/०१/२०२० रोजी आयोजीत केल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय महोत्सवामध्ये सहभागी होतील.

या महोत्सवामध्ये सादर करण्यात येणाऱ्या संशोधन प्रकल्पांची विभागणी पुढील सहा शाखांमध्ये करण्यात येणार आहेः १. Humanities, Languages, Fine Arts, २. Commerce, Management, Law, ३. Pure Sciences, ४. Agriculture and Animal Husbandry, ५. Engineering and Technology, आणि ६. Medicine and Pharmacy. मात्र कोणत्याही शाखेमध्ये शिकत असणारा विद्यार्थी वरील कोणत्याही शाखेअंतर्गत आपले संशोधन सादर करू शकतो.

या महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांनी व शिक्षकानी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र—कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनो केले आहे. आधिक माहितीसाठी शिवाजी विद्यापीठाचे आविष्कार समन्वयक डॉ. शशिभूषण महाडिक यांचेशी ९९२१५१६७६५ या भ्रमणध्वनी कमांकावर संपर्क साधावा.